# न्यूज एक्सप्रेस मराठी

मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल



बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!

: ९८३४१३८४८२




# पिंपरीतील 17 ‘आरओ’ प्रकल्पाला टाळे

## 10 आरओ प्लांटस्, 7 वॉटर एटीएम केले बंद : पाणीपुरवठा विभागाची कारवाई

**पिंपरी | प्रतिनिधी**

गुईलेन बॅरे सिंड्रोम (जीबीएस) या आजाराचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी महापालिकेने कठोर पाऊले उचलण्यास सुरूवात केली आहे. दूषित पाणी वापरून पाण्याची बॉटलिंग करणाऱ्या अनधिकृत खासगी आरओ प्रकल्पाची तपासणी मोहिम हाती घेण्यात आली आहे. या मोहिमेत आढळून आलेल्या १७ आरओ प्रकल्पावर कारवाई केली. संबंधित चालकांना प्रकल्प तात्काळ बंद करण्याबाबत आदेश देण्यात आले आहेत, अशी माहिती माहिती आयुक्त शेखर यांनी दिली.




गुईलेन बॅरे सिंड्रोम (जीबीएस) या आजाराचा प्रादुर्भाव व वाढत्या सार्वजनिक आरोग्यविषयक समस्यांच्या पार्श्वभूमीवर पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या वतीने खाजगी आरओ प्रकल्पाच्या पाण्याच्या नमुन्यांची तपासणी करण्यात येत आहे. त्यामध्ये अनधिकृत खाजगी आरओ प्रकल्प दूषित पाणी वापरून पाण्याची बॉटलिंग करून पुरवठा करत असल्याचे निदर्शनास आले होते. असे दूषित पाणी प्रामुख्याने बोअरवेल्स व उघड्या जलस्त्रोतांमध्ये आढळते. नागरिकांच्या सार्वजनिक आरोग्याचे संरक्षण करण्यासाठी आणि भविष्यातील आरोग्यविषयक समस्या टाळण्यासाठी सध्या शहरात दूषित पिण्याचा पुरवठा करणाऱ्या अनधिकृत वॉटर बॉटलिंग आणि आरओ प्रकल्पावर तात्काळ कारवाई केली जात आहे.

सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टीने शहरातील नागरिकांना शुद्ध आणि सुरक्षित पाणी मिळावे, यासाठी अनधिकृतपणे दूषित पाण्याची बॉटलिंग करणाऱ्या आरओ प्रकल्पावर कठोर कारवाई केली जात आहे. पाणी हे आरोग्याचा मूलभूत घटक असल्याने त्याच्या गुणवत्तेचा सखोल आढावा घेतला जाईल, असे पाणी पुरवठा विभागाचे मुख्य अभियंता प्रमोद ओंभासे यांनी सांगितले.

### प्रभागनिहाय कारवाई

» पाणीपुरवठा विभागाचे सहशहर अभियंता अजय सूर्यवंशी यांच्या मार्गदर्शनाखाली उपअभियंता, कनिष्ठ अभियंता, प्लंबर यांच्यामार्फत क्षेत्रीय कार्यालयनिहाय या प्लांट्सची तपासणी केली जात आहे. यामध्ये फ क्षेत्रीय कार्यालय दोन, ड क्षेत्रीय कार्यालय दोन आरओ प्रकल्प तर सात एटीएम आरओ प्रकल्प, ब क्षेत्रीय कार्यालय एक , ग क्षेत्रीय कार्यालय चार आणि ह क्षेत्रीय कार्यालय एक आरओ प्रकल्पाचा समावेश आहे. आरओ प्रकल्प (प्लांट) बंद बाबतच्या आदेशाचे उल्लंघन करणाऱ्यांवर वैद्यकीय विभागामार्फत कठोर कारवाई करण्यात येणार आहे.

---

# पीएमआरडीएचा विकास आराखडा रेंगाळला

## राज्य सरकारची उदासीनता : नवीन विकासकामांसाठी सापडेना मुहूर्त

**पिंपरी | प्रतिनिधी**

पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून (पीएमआरडीए) तयार केलेला प्रारूप विकास आराखडा प्रसिद्ध होऊन साडेतीन वर्षांचा कालावधी उलटल्यानंतरही हा आराखडा अंतिम झालेला नाही. विकास आराखड्याबाबत दाखल याचिकेत राज्य सरकारने अद्याप मुंबई उच्च न्यायालयात म्हणणे मांडले नाही. त्यामुळे याविषयी राज्य सरकारचीच जास्त उदासीनता दिसून येत आहे. पर्यायाने, पीएमआरडीए हद्दीत नव्याने प्रस्तावित विकासकामांमध्ये अडथळे निर्माण होत आहेत.

पीएमआरडीएच्या प्रारूप विकास आराखड्यासंदर्भात महानगर नियोजन समितीचे सदस्य वसंत सुदाम भसे, सुखदेव तापकीर आणि दीपाली हुलावळे यांचे विविध आक्षेप होते. त्यांनी या विरोधात मुंबई उच्च न्यायालयात 25 जानेवारी 2023 ला याचिका दाखल केली. याचिकेस अनुसरून मुंबई उच्च न्यायालयाने विकास आराखड्याबाबत ‘जैसे थे’ स्थिती ठेवण्याचे आदेश दिलेले आहेत.




मुंबई उच्च न्यायालयामध्ये याचिकाकर्त्यांकडून त्यांचे म्हणणे मांडण्यात आलेले आहे. राज्य सरकारचेच म्हणणे मांडणे बाकी आहे. राज्य सरकारने म्हणणे मांडल्यानंतर न्यायालयाकडून याबाबत अंतिम निर्णय अपेक्षित आहे. राज्य सरकार याबाबत आपले म्हणणे मांडण्यासाठी उदासीनता दाखवित आहे. राज्यामध्ये महायुतीचे सरकार सत्तेत आल्यानंतर किमान आता या आराखड्याबाबतची कार्यवाही जलद गतीने व्हायला हवी. सध्या आराखड्याच्या सुनावणीसाठी तारीख पे तारीख पडत आहे. मात्र, आराखड्याबाबत निर्णय होत नसल्याने पीएमआरडीए हद्दीतील 9 तालुक्यांतील 817 गावांमध्ये नवीन विकासकामे करण्यासाठी मुहूर्त सापडेनासा झाला आहे.

उच्च न्यायालयाकडून अंतिम निर्णय मिळाल्यानंतरही प्रारुप आराखड्याबाबत दाखल सूचना व हरकतींचा विचार करून आराखडा अंतिम करण्याची कार्यवाही पूर्ण होण्यास आणखी काही कालावधी लागू शकतो. त्यामुळे आता याबाबत राज्य सरकारने आपले म्हणणे मांडण्यासाठी लवकरात लवकर न्यायालयात सुनावणीची तारीख घेणे गरजेचेआहे.

> “ महापालिकेच्या आरक्षित जागेवर तसेच डीपीतील (विकास आराखडा) रस्त्यांवर असलेली अनधिकृत पत्राशेड, कारखाने, गोदामे, भंगार दुकाने तसेच अनधिकृत बांधकामांवर ब्लॉकनिहाय अतिक्रमण हटविण्याची कारवाई करण्यात येत आहे. यापुढेही ही कारवाई सुरू राहणार आहे. यामध्ये ज्यांचे साहित्य किंवा मशिनरी असतील त्यांनी त्या तत्काळ काढून घेऊन महापालिकेस सहकार्य करावे.
>
> - प्रदीप जांभळे-पाटील, अतिरिक्त आयुक्त, महापालिका.

# पुण्यातील 55 ठिकाणचे पाणी पिण्यास अयोग्य!

## राज्य आरोग्य प्रयोगशाळेने केली तपासणी : GBS रुग्णसंख्येत वाढ सुरूच

**पुणे | प्रतिनिधी**

पुण्यात नांदेडगाव परिसरात गुइलेन बॅरे सिंड्रोमचा उद्रेक झाला आहे. या परिसरातील पाण्याचे नमुने रासायनिक आणि जैविक तपासणीसाठी राज्य आरोग्य प्रयोगशाळेकडे पाठविण्यात आले होते. त्यातील ५५ ठिकाणचे पाणी नमुने दूषित आढळले असून, ते पिण्यास अयोग्य असल्याचे निष्पन्न झाले आहे. दरम्यान, जीबीएसच्या रुग्णसंख्येतील वाढ सुरूच असून, एकूण रुग्णसंख्या १८४ वर पोहोचली आहे.



आरोग्य विभागाने जीबीएसचे रुग्ण आढळून आलेल्या परिसरातील पाण्याचे नमुने आरोग्य प्रयोगशाळेकडे पाठविले होते. नांदेडगाव परिसरात जीबीएसचा उद्रेक झाला असल्याने तेथील सर्वाधिक नमुने होते. या पाण्याच्या नमुन्यांची रासायनिक आणि जैविक तपासणी राज्य आरोग्य प्रयोगशाळेने केली. एकूण ४ हजार ७६१ नमुन्यांची तपासणी करण्यात आली. त्यातील ५५ पाणी नमुने दूषित आढळले असून, ते पिण्यास अयोग्य असल्याचा निष्कर्ष प्रयोगशाळेने काढला आहे. पिण्यास अयोग्य आढळलेले सर्व नमुने नांदेड गाव परिसरातील आहेत, अशी माहिती आरोग्य विभागातील सूत्रांनी दिली.

राज्यात पुणे विभागात जीबीएसचे सर्वाधिक १७६ रुग्ण आहेत. त्यात पुणे महापालिका ३७, महापालिकेत नव्याने समाविष्ट झालेली गावे ८९, पिंपरी-चिंचवड महापालिका २६, पुणे ग्रामीण २४ आणि इतर जिल्ह्यांतील ८ रुग्ण आहेत. आतापर्यंत जीबीएसमुळे ६ जणांचा मृत्यू झाला आहे. जीबीएसच्या ४७ रुग्णांवर अतिदक्षता विभागात उपचार सुरू असून, २१ रुग्ण व्हेंटिलेटरवर आहेत. राज्यभरात ८९ रुग्ण बरे होऊन रुग्णालयातून घरी गेले आहेत.

महापालिकेकडून नांदेडगाव परिसरातील चिकनचे नमुने तपासणीसाठी राष्ट्रीय विषाणूविज्ञान संस्थेत (एनआयव्ही) पाठविण्यात आले आहेत. याचबरोबर अन्न औषध व प्रशासनाने नांदेड गाव परिसरातील हॉटेलमधून खाद्यपदार्थांचे नमुने घेऊन ते तपासणीसाठी एनआयव्हीकडे पाठविले आहेत. याचबरोबर रुग्णसंख्या जास्त असलेल्या भागात आरोग्य विभागाकडून रुग्णांचे सर्वेक्षण सुरू आहे. पुणे महापालिकेने ४६ हजार ५३४ घरांचे सर्वेक्षण केले असून, पिंपरी-चिंचवड महापालिकेने २४ हजार ८८३ आणि पुणे ग्रामीणने १३ हजार २९१ अशा एकूण ८४ हजार ७०८ घरांचे सर्वेक्षण केले आहे.

### जीबीएस रुग्णसंख्या

- एकूण रुग्ण – १८४
- अतिदक्षता विभागात दाखल – ४७
- व्हेंटिलेटरवरील रुग्ण – २१
- बरे झालेले रुग्ण – ८९
- एकूण मृत्यू – ६

**वयोगटनिहाय रुग्णसंख्या**

| वयोगट | रुग्ण |
|---|---|
| ० ते ९ | २३ |
| १० ते १९ | २१ |
| २० ते २९ | ४२ |
| ३० ते ३९ | २३ |
| ४० ते ४९ | २६ |
| ५० ते ५९ | २६ |
| ६० ते ६९ | १६ |
| ७० ते ७९ | ३ |
| ८० ते ८९ | ४ |
| **एकूण** | **१८४** |

# प्रचिती इंटरनॅशनल स्कूलला 'उत्कृष्ट शाळा 2025' चा पुरस्कार प्रदान

## राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांच्या हस्ते धुळे जिल्ह्यातील उत्कृष्ट शाळा 2025 चा पुरस्कार प्रदान

**पिंपरी | प्रतिनिधी**

भविष्यासाठी विद्यार्थी नाही तर विद्यार्थ्यांचे भविष्य घडविणारी प्रचिती इंटरनॅशनल स्कूलला महाराष्ट्राचे राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांच्या हस्ते धुळे जिल्ह्यातील उत्कृष्ट शाळा २०२५ चा पुरस्कार प्रदान करण्यात आला. प्रचिती इंटरनॅशनल स्कूल ही धुळे जिल्ह्यातील साक्री तालुक्यातील एकमेव CBSE मान्यताप्राप्त शाळा आहे. या शाळेची स्थापना २०११ साली झाली आहे.

प्रचिती शाळा ही गुणवत्तापूर्ण शिक्षण, उत्कृष्ट शैक्षणिक कामगिरी आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी ओळखली जाते. या उल्लेखनीय कार्याची दखल घेत नवभारत टाइम्स तर्फे प्रचिती इंटरनॅशनल स्कूलला धुळे जिल्ह्यातील उत्कृष्ट शाळा २०२५ हा पुरस्कार महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. या पुरस्कारासाठी विविध निकषांवर शाळेचे मूल्यमापन करण्यात आले. त्यामध्ये शैक्षणिक गुणवत्ता, विद्यार्थ्यांची प्रगती, शिक्षकांचे योगदान, उपक्रमशीलता, सातत्याने उत्कृष्ट शिक्षण, नैतिक मूल्य, गुणवत्ता पूर्ण अध्यापन आणि सामाजिक कार्य आदींचा समावेश होता. प्रचिती शाळा केवळ परीक्षांमध्येच चांगली कामगिरी करणारी संस्था नाही, तर सुसंस्कार, नेतृत्वगुण आणि सामाजिक जबाबदारी जोपासणारी एक चळवळ आहे खेळ, कला,विज्ञान, सामाजिक उपक्रम आणि नाविन्यपूर्ण उपक्रम यामध्येही शाळेने उत्तुंग यश मिळवले आहे.



हा पुरस्कार वितरण समारंभ मुंबई येथे संपन्न झाला. राज्यपालांच्या हस्ते संस्थेचे संस्थापक अध्यक्ष प्रशांत पाटील, प्राचार्या वैशाली लाडे, समन्वयक वैभव सोनवणे व एच.ओ. डी. कांचन अहिरराव यांनी पुरस्कार स्वीकारला. या पुरस्कारामागे खऱ्या अर्थाने विद्यार्थी व शिक्षकांप्रती तळमळ असणारे संस्थेचे संस्थापक अध्यक्ष प्रशांत भीमराव पाटील यांचा सिंहाचा वाटा आहे. शाळेचे सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी आणि पालक यांच्या अथक परिश्रमांचे हे फलित असल्याचे प्रशांत पाटील यांनी नमूद केले. शाळेत विज्ञान प्रदर्शन, हस्तकला स्पर्धा, खेळ आणि सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित केले जातात. शाळेतील ग्रंथालयात विविध विषयांवरील पुस्तके, मासिके आणि संदर्भग्रंथ उपलब्ध आहेत. शाळेत संगणक प्रयोगशाळा, विज्ञान प्रयोगशाळा आणि खेळाच्या सुविधा अत्याधुनिक आहेत. डिजिटल क्लासरूम, प्रोजेक्ट आधारित शिक्षण आणि वैज्ञानिक दृष्टिकोन जोपासण्यासाठी सर्जनशीलता व संशोधनावर भर दिला जातो.

### ॲक्टिव्हिटी बेस्ड शिक्षण हा शाळेचा केंद्रबिंदू..

आजपर्यंत प्राचार्या सह १५ शिक्षकांना शिक्षण मंत्र्यांच्या हस्ते आदर्श शिक्षक पुरस्कार मिळाला आहे. तसेच उच्च व तंत्र शिक्षण मंत्री मा उदयजी सामंत (2021), माजी शिक्षण मंत्री मा वर्षाताई गायकवाड (2022), माजी शिक्षण मंत्री मा दिपकजी केसरकर यांच्या हस्ते धुळे जिल्ह्यातील उत्कृष्ट शाळा पुरस्कार मिळाले आहेत. त्याच बरोबर CBSE चे Regional Head मा महेश धर्माधिकारी यांच्या हस्ते शिक्षण महर्षी, Star Education Award 2023, खानदेश भूषण हे पुरस्कार मिळाले आहेत. शाळेत दिवाळी, (दही हंडी) कृष्ण जन्मोत्सव, ग्रॅज्युएशन डे साजरे केले जातात. तसेच किल्ल्यांची स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा घेतल्या जातात. शाळेच्या या यशाबद्दल सर्वत्र अभिनंदन होत आहे. या पुरस्कारामुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढेल आणि शाळा भविष्यातील उत्कृष्टता साधण्यासाठी अधिक जोमाने कार्य करेल असा विश्वास प्रशांत पाटील यांनी व्यक्त केला.

# महापालिकेच्या मालमत्ता लिलावात कोणी फिरकेना

## थकबाकीदारांच्या मालमत्ता लिलावाला प्रतिसाद मिळेना म्हणून तिसऱ्यांदा प्रक्रिया राबवण्याची वेळ

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या एक लाखापुढील थकबाकीदारांच्या निवासी व बिगर निवासी अशा ४३ मालमत्ता जप्त करून सील करण्यात आल्या. त्या मालमत्तेचा करसंकलन विभागाने लिलाव प्रक्रिया सुरू केली. पहिल्या, दुसऱ्या लिलाव प्रक्रियेत कोणीही सहभागी झाले नाही.

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या एक लाखापुढील थकबाकीदारांच्या निवासी व बिगर निवासी अशा ४३ मालमत्ता जप्त करून सील करण्यात आल्या. त्या मालमत्तेचा करसंकलन विभागाने लिलाव प्रक्रिया सुरू केली. पहिल्या, दुसऱ्या लिलाव प्रक्रियेत कोणीही सहभागी झाले नाही.

प्रतिसाद मिळेना म्हणून त्या मालमत्तेचा आता तिसऱ्यांदा लिलाव प्रक्रिया राबविण्यात येणार आहे. यावेळेस मालकांनी व इतर कोणी प्रतिसाद न मिळाल्यास सर्वच मालमत्ता नाममात्र बोलीवर महापालिकेकडे जमा करण्यात येणार आहेत.

पिंपरी-चिंचवड शहरातील एक लाखाहून अधिक थकबाकी असलेल्या नागरिकांच्या मालमत्ता वसुलीची जोरदार मोहीम सुरू आहे. मालमत्ताकर थकबाकीदारांच्या निवासी आणि बिगर निवासी अशा ४३ मालमत्तांच्या लिलावाची प्रक्रिया राबविली. मात्र, दोनही वेळा या मालमत्तांच्या मालकांनी आणि लिलावात खरेदी करू इच्छिणाऱ्यांनी महापालिकेशी कोणत्याही प्रकारचा संपर्क केला नाही. त्यामुळे तब्बल २२१ कोटी ५३ लाखांच्या ४३ मालमत्तांसाठी तिसऱ्यांदा लिलाव राबविण्यात येणार आहे. कर आकारणी व कर संकलन विभाग आता पुन्हा तिसऱ्यांदा लिलाव प्रक्रिया राबविण्याची महापालिका प्रशासनाने तयारी सुरू केली आहे. तिसऱ्या लिलावात मालक अथवा मालमत्ता खरेदी करू इच्छिणाऱ्यांनी प्रशासनाशी संपर्क न साधल्यास या मालमत्ता नाममात्र बोलीवर महापालिकेकडे जमा करण्यात येणार आहेत.

महापालिकेच्या करसंकलन विभागाकडून आता ४३ मालमत्तांची तिसऱ्या लिलाव प्रक्रिया सुरू केली आहे. या प्रक्रियेतदेखील मालक अथवा मालमत्ता खरेदी करू इच्छिणाऱ्यांनी प्रशासनाशी संपर्क न साधल्यास या मालमत्ता नाममात्र बोलीवर महापालिकेकडे जमा करण्यात येणार आहेत.

कर संकलन कार्यालयाने मोठ्या थकबाकीदारांच्या मालमत्ता सील करून जप्त केल्या आहेत. तरीही मालमत्ताधारकांकडून प्रतिसाद मिळत नसल्याने महापालिकेने त्या मालमत्तांचा दोन वेळा लिलाव जाहिर केला. एकूण ४३ मालमत्तांची यादी कर संकलन विभागाने जानेवारी २०२५ लिलावासाठी वर्तमानपत्रात दुसऱ्यांदा नावे, थकबाकी आणि मालमत्तांचे मूल्यांकन वर्तमानपत्रातून जाहीर केले. यामध्ये २३ निवासी व २० बिगरनिवासी मालमत्ता आहेत. मालमत्ताधारकांकडे १ लाख ते ८ लाखांपर्यंतची थकबाकी आहे.



### ...अन्यथा मालमत्ता महापालिकेकडे होणार जमा

» लिलाव प्रक्रियेत सहभागी होण्यासाठी कर संकलन कार्यालयात ३१ जानेवारीला दुपारी ३ पर्यंत आवश्यक कागदपत्रे सादर करून नावनोंदणी करणे आवश्यक होते. मात्र, महापालिका प्रशासनाने दिलेल्या मुदतीत मालमत्ताधारक आणि मालमत्ता लिलावाद्वारे खरेदी करण्यासाठी एकाही नागरिकाने नावनोंदणी केली नाही. त्यामुळे कर आकारणी व कर संकलन विभाग आता पुन्हा तिसऱ्यांदा लिलाव प्रक्रिया राबविण्याची महापालिका प्रशासनाने तयारी सुरू केली आहे. तिसऱ्या लिलावात मालक अथवा मालमत्ता खरेदी करू इच्छिणाऱ्यांनी प्रशासनाशी संपर्क न साधल्यास या मालमत्ता नाममात्र बोलीवर महापालिकेकडे जमा करण्यात येणार आहेत.

> " महापालिकेच्या वतीने जाहीर करण्यात आलेल्या ४३ मालमत्ताधारकांना एक शेवटची संधी म्हणून तिसऱ्यांदा लिलाव प्रक्रिया करण्यात येणार आहे. लिलाव जाहीर झाल्यापासून २० दिवसांची मुदत देण्यात येईल. या मुदतीत मूळ मालमत्ताधारकाने संपूर्ण थकबाकीसह लिलाव प्रक्रियेचा खर्च जमा केल्यास ती मालमत्ता लिलाव प्रक्रियेतून वगळण्यात येईल. तसेच तिसऱ्या लिलावालाही प्रतिसाद न आल्यास नाममात्र बोलीवर संबंधित सर्व मालमत्ता महापालिकेकडे जमा करण्यात येणार आहेत.
>
> -अविनाश शिंदे, साहाय्यक आयुक्त, कर आकारणी व कर संकलन विभाग.

# येत्या पाच वर्षात मावळचा पूर्ण कायापालट करणार : आमदार सुनील शेळके

## महायुती व मित्र पक्षांच्या वतीने आभार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी आमदार शेळके बोलत होते.

**पिंपरी | प्रतिनिधी**

आपण सर्वांनी आम्हाला विकासकामांसाठी निवडून दिले आहे. त्या विकासकामांसाठीच आम्हाला बोलवा, अन्य कार्यक्रमाला बोलावू नका, अशी विनंती वजा आवाहन आमदार सुनील शेळके यांनी केले. वडगाव मावळ येथे शनिवारी (दि.८) महायुती व मित्र पक्षांच्या वतीने आभार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी आमदार शेळके बोलत होते. पुढे बोलताना त्यांनी, पुढील पाच वर्षात तालुक्यातील शिल्लक राहिलेली विकासकामे मार्गी लावू व तालुक्याचा पूर्ण कायापालट करू, अशी ग्वाही देखील मावळच्या जनतेला दिली. वडगाव महायुती व मित्र पक्षांच्या वतीने आभार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी आमदार शेळके बोलत होते.

यावेळी प्रसंगी खासदार श्रीरंग बारणे, आरपीआयचे (आठवले गट) प्रदेश सचिव सूर्यकांत वाघमारे, एसआरपी पक्षाचे अध्यक्ष रमेश साळवे, राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष गणेश खांडगे, शिवसेना तालुका प्रमुख राजेश खांडभोर, मावळ भाजपा प्रभारी भास्करराव म्हाळसकर, तळेगाव शहर भाजपा अध्यक्ष संतोष दाभाडे, लोणावळा शहरातील भाजपा नेते देविदास कडू, गणेश ढोरे, विठ्ठलराव शिंदे, शरद हुलावळे, साहेबराव कारके, दिपाली गराडे आदी मान्यवर, पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

खासदार श्रीरंग बारणे यांनीही आपले मनोगत व्यक्त करीत, राज्यात महायुतीचे कणखर सरकार आले असून महायुतीवर विश्वास ठेवून आम्ही मावळचा विकास करणार आहोत. यासाठी आपण सर्वांनी मनापासून भक्कमपणे महायुतीच्या पाठीशी उभे राहून साथ द्यावी, असे आवाहन बारणे यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक राष्ट्रवादीचे तालुका अध्यक्ष गणेश खांडगे यांनी केले. सूत्रसंचालन राज खांडभोर यांनी केले. किशोर सातकर यांनी आभार मानले.



### महायुतीच्या पाठीशी उभे राहून साथ द्यावी

» खासदार श्रीरंग बारणे यांनीही आपले मनोगत व्यक्त करीत, राज्यात महायुतीचे कणखर सरकार आले असून महायुतीवर विश्वास ठेवून आम्ही मावळचा विकास करणार आहोत. यासाठी आपण सर्वांनी मनापासून भक्कमपणे महायुतीच्या पाठीशी उभे राहून साथ द्यावी, असे आवाहन बारणे यांनी केले.

# पुरंदरच्या शेतकऱ्यांमध्ये पुन्हा अस्वस्थता!

## मुख्यमंत्र्यांच्या विमानतळाबाबतच्या वक्तव्यावरून तालुक्यात चलबिचल

**पुणे | प्रतिनिधी**

पुरंदरमधील आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्प पुण्याच्या विकासासाठी महत्वाचा असून कोणत्याही परिस्थितीत पूर्ण होणारच. यामुळे पुणे आणि परिसराचा विकास झपाट्याने होणार आहे. याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पुणे येथील कार्यक्रमात जाहीर सांगितले असून शेतकऱ्यांना जास्तीत जास्त परतावा देण्याचेही सुतोवाच त्यांनी केले आहे. मात्र मुख्यमंत्र्याच्या याच विधानावरून पुरंदरच्या शेतकऱ्यांमध्ये पुन्हा एकदा अस्वस्थता निर्माण झाली आहे. पुण्याच्या विकासासाठी पुरंदरच्या शेतकऱ्यांना कायमचे विस्थापित व्हावे लागत असेल तर प्रकल्प नक्की कोणासाठी, असा प्रश्न येथील शेतकरी उपस्थित करीत आहेत.

पुरंदर तालुक्यातील वनपुरी, उदाचीवाडी, पारगाव, कुंभारवळण, एखतपूर मुंजवडी आणि खानवडी अशा सात गावांमध्ये विमानतळ प्रकल्प जाहीर झाला असून या गावांतील 2835 हेक्टर क्षेत्र संपादित केले जाणार आहे. यामध्ये गावठाण वगळले जाणार असल्याचे शासनाने सांगितले आहे. विशेष म्हणजे संपादित केलेल्या जागेतच चार ते पाच किलोमीटर लांबीच्या दोन धावपट्ट्या पूर्व पश्चिम करण्यात येणार आहेत. आणि वनपुरी पासून सलग पारगावचे अंतर पाहिल्यास सात ते आठ किलोमीटर आहे. त्यामुळे धावपट्टीमधून गावठाण कसे वगळणार, हा प्रश्नही निर्माण झाला आहे.

शासनाने नुकतेच पुरंदर तालुक्यात रेल्वेचा विस्तार करण्याच्या प्रस्तावास मंजुरी दिली असून रेल्वे आता पारगावच्या मार्गावरून थेट विमातळपर्यंत मालाची ने आण करण्यासाठी नवीन मार्गक्रमिका करण्यात येणार आहे. त्याच प्रमाणे हडपसर वरून दिवे घाट मार्गे सासवड, बोपदेव घाट मार्गे तसेच जेजुरी ते उरुळीकांचन, भोर, नारायणपूर ते सासवड. आणि सासवडवरून वाघापूर अशा सर्व बाजूने रस्त्यांचे चौपदरी ते सहापदरी जाळे करण्यात येणार आहे.

विशेष म्हणजे या रस्त्यांच्या मार्गातील सासवडवरून कुंभारवळण, एखतपूर मुंजवडी, खानवडी, पारगाव हा रस्ता पूर्णपणे वगळण्यात आला असल्याचे दिसत आहे. त्यामुळे तालुक्यात रस्त्यांचे जाळे निर्माण करून सासवडवरून पूर्वेकडे केवळ वनपुरी मार्गे वाघापूर हा एकच मार्ग विस्तारण्याचे दिसून येत आहे. त्यामुळे वनपुरी आणि उदाचीवाडी या दोन गावांच्या उत्तरेकडील भाग वगळता दक्षिणेकडील भागासह इतर सर्व गावे आणि गावठाण उठविण्यात येणार असल्याचे दिसून येत आहे.



### खानवडीमधील गावठाण कसे वाचविणार?

» खानवडीमध्ये शासनाने आंतरराष्ट्रीय मुलींच्या शाळेची उभारणी सुरू केली असून त्यासाठी गावाकडून केवळ सात एकर जागेचे ना हरकत प्रमाणपत्र घेतले. त्याचबरोबर याच परिसरात सौर उर्जा प्रकल्पासाठी जागेची मागणी केली, परंतु ग्रामस्थांनी त्यास जाहीर विरोध केला. असे असताना जिल्हाधिका-यांनी तब्बल 55 एकर क्षेत्रावर ताबा टाकला आहे. त्यातील 35 एकर क्षेत्रावर सौरऊर्जा प्रकल्प उभारण्यात येणार असून येत्या सहा महिन्यात पूर्ण करण्याचे शासनाच्या विचाराधीन आहे. त्यामुळे गावालाच आता गावठाणसाठी जागा उरलेली नाही. तर उर्वरित जागेवर विमानतळ प्रकल्प करण्याचे निश्चित आहे. मग गावठाण कसे वाचविणार ?

### ...तर प्रकल्प नक्की कोणासाठी ?

» पुण्याच्या विकासासाठी शासनाचा पुरंदरच्या विमानतळासाठी अट्टाहास सुरू असला तरी प्रकल्प पासून जवळपास 10 किलोमीटर परिसरात रस्त्यांचे जाळे असून विमानतळवर थेट वाहतूक होईल. त्यामुळे परिसरात त्याचा कितपत फायदा होईल. तसेच पुरंदर पासून सर्व परिसराला त्याचा निश्चित फायदा होणार असला तरी ज्या भागात प्रकल्प होणार आहे. त्या परिसरातील नागरिकांना कायमचे विस्थापित व्हावे लागत असेल तर प्रकल्प नक्की कोणासाठी, असा प्रश्न उदाचीवाडी येथील संतोष हगवणे यांनी उपस्थित केला आहे.

# "क्लीन वाघोली, ग्रीन वाघोली" अभियानास उत्स्फूर्त प्रतिसाद

## भाजपा युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष संदिप सातव आणि रत्नदीप सोशल फाउंडेशनच्या अध्यक्षा रत्नमाला संदिप सातव यांनीन ही मोहीम हाती घेतली आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

वाघोली परिसरातील अस्वच्छता, दुर्गंधी, कचऱ्याचे अव्यवस्थापन आणि त्यामुळे पसरणारे साथीचे विविध आजार यामुळे नागरिक त्रस्त झाले होते. पुणे महानगरपालिकेवर सध्या प्रशासन बसलेले असल्याने आणि लोकप्रतिनिधी नसल्याने वाघोलीकरांच्या समस्यांकडे दुर्लक्ष होत असल्याचे निदर्शनास आले. या सर्व अडचणी लक्षात घेऊन, भाजपा युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष संदिप सातव आणि रत्नदीप सोशल फाउंडेशनच्या अध्यक्षा रत्नमाला संदिप सातव यांनी "क्लीन वाघोली, ग्रीन वाघोली" ही मोहीम हाती घेतली आहे.

मोहिमअंतर्गत अंतर्गत, वाघोलीतील विविध परिसरात "क्लीन वाघोली, ग्रीन वाघोली" अभियान राबवले जात आहे. या अभियानात परिसराची स्वच्छता करणे, कचरा गोळा करणे व त्याची योग्य विल्हेवाट लावणे, परिसराचे सौंदर्य वाढवणे, तसेच स्वच्छ व निरोगी वातावरणाबद्दल जनजागृती करणे असे विविध उपक्रम समाविष्ट आहेत.

रत्नदीप सोशल फाउंडेशन आणि पुणे महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने आज सकाळी कोणार्क ऑर्चिड, पाल्म नेस्ट बंगलो, अरोरा बंगलो, ब्लॉसम, अर्बनो, चैतन्य टेक्नो स्कूल या सोसायटी परिसरात "क्लीन वाघोली, ग्रीन वाघोली" अभियानाची अंमलबजावणी करण्यात आली. या अभियानाबद्दल वाघोलीतील नागरिकांमध्ये एवढे कुतूहल निर्माण झाले की, जवळपास 250-300 नागरिक उत्स्फूर्तपणे या अभियानात सहभागी झाले होते. प्रशासकीय स्तरावर देखील या उपक्रमाचे कौतुक होत असल्याचे निदर्शनास आले आहे.

या वेळी नगर रोड क्षेत्रीय कार्यालयाच्या वरिष्ठ आरोग्य निरीक्षक श्रीमती सुषमा मुंडे, आरोग्य निरीक्षक संजय भुसारे, मुकादम अजय थोरात ,दिपक वाघमारे, सहमुकादम प्रशांत कुंभार, अनिल राठोड तसेच सर्व कर्मचारी व ड्रायव्हर, सेवक तसेच शाळेचे शिक्षक, पदाधिकारी आदी मान्यवरांचे "क्लीन वाघोली ग्रीन वाघोली" या मोहिमेला विशेष सहकार्य लाभले.



"प्रधानमंत्री श्री. नरेंद्र मोदी साहेबांच्या स्वच्छ भारत अभियानाच्या संकल्पनेतून प्रेरित होऊन, वाघोलीत 'क्लीन वाघोली, ग्रीन वाघोली' या उपक्रमाची सुरुवात आम्ही केली आहे. यामध्ये नागरिकांनी सक्रिय सहभाग घेतला असून, स्वच्छतेसाठी विविध उपक्रम राबवले जात आहेत. या उपक्रमामुळे वाघोली परिसर अधिक स्वच्छ आणि सुंदर बनत आहे. नागरिकांचा सहभाग हे या उपक्रमाचे प्रमुख वैशिष्ट्य आहे."

- संदिप सातव (पुणे जिल्हाध्यक्ष, भाजपा युवा मोर्चा)

"रत्नमाला सातव आणि संदिप सातव यांनी 'क्लीन वाघोली, ग्रीन वाघोली' या अभियानाची सुरुवात केल्याबद्दल आम्ही त्यांचे आभार मानतो. या अभियानामुळे 'आपला परिसर स्वच्छ आणि सुंदर ठेवणे हे आपले कर्तव्य आहे' अशी भावना सर्व नागरिकांमध्ये तयार होत आहे."

- कणिक पांडा (नागरिक)